लोकमत



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. बी.व्ही. पवार. सोबत प्रा. राजू आमले, सुगंधा दाणी, सचिन सोनवणे, अरविंद वानखेडे आदी.

# विद्यापीठात सायबर सुरक्षेवर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांसाठी क्विक हेल फाउंडेशनच्या वतीने नुकतीच सायबर सुरक्षा व जागरूकता या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. २०० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत भाग घेतला.

संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. बी.व्ही. पवार यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. क्विक हेल फाउंडेशनच्या वरिष्ठ कार्यकारी सुगंधा दाणी, जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातील सायबर सुरक्षेचे अधिकारी सचिन सोनवणे, अरविंद वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. बी.व्ही. पवार यांनी सभाधिटपणा व संवाद कौशल्य, सचिन सोनवणे यांनी क्यू.आर. कोड, ऑनलाईन मार्केट या विषयावर तर अरविंद वानखेडे यांनी सायबर डाटा, फसविणाऱ्या साईट आदींबद्दल माहिती दिली. सुगंधा दाणी यांनी विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण घेवून मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. समन्वयक डॉ. राजू आमले यांनी प्रास्ताविक केले. आशिष पाटील यांनी आभार मानले.

Jalgaon Main
Page No. 5 Aug 25, 2023
Powered by: erelego.com